**महाराष्ट्र शासन**
**उपसंचालक,आरोग्य सेवा (परिवहन),पुणे.**

| दूरध्वनिक्रं. (वै) (०२०) २६०५८५२५ आरोग्य सेवा | स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव | उपसंचालक,आरोग्यसेवा (परिवहन), पुणे. ८ केनेडीरोड, नायडू हॉस्पिटल कंपाऊंड,पुणे ४११००१ यांचे कार्यालय. कार्यालयीन दूरध्वनि क्रं.(०२०) २६०५८५२५, (०२०) २६०५८९१२ ई-मेलआयडी :ddhs.transport@gmail.com |
|---|---|---|
| **दरपत्रकाची सूचना** | जाक्र.आसेप/लेखा ११७-४/कार्यालयीन भांडार/संगणक संच नेटवर्कीग यंत्रणा /सेवासंविदा करार/ दरपत्रके/ ९०७० /२०२५, दिनांक २२ जुलै२०२५ | |

प्रति,
-----------------------------------------
-----------------------------------------
-----------------------------------------

**विषय : संगणक संच आणि नेटवर्कींग यंत्रणेसाठी वार्षिक देखभाल व दुरुस्ती सेवा संविदा करार (AMC) करणेसाठी दरपत्रके सादर करणेबाबत..**

या कार्यालयातील सर्व कार्यासना मध्ये असलेले संगणक संच (प्रिंटर व स्कॅनर सह) आणि नेटवर्कींग यंत्रणा हे सतत सुस्थितीत रहावे यासाठी त्यांच्या देखभाल व दुरुस्तीसाठी साठी वार्षिक देखभाल व दुरुस्तीचा सेवा संविदा करार करणेसाठी दरपत्रके मागविण्यात येत आहेत.

यासाठी प्रस्तुत बाबींचे दर या कार्यालयास सोबत जोडलेल्या **प्रपत्रात** सादर करावयाचे आहेत. जीएसटी आकार वेगळा दर्शविण्यात यावा. सदर दर आपले संस्थेच्या लेटरहेडवर दिनांक ०१/०८/२०२५ रोजी सायंकाळी ६.१५ पर्यंत सिलबंद लिफाफयामध्ये या कार्यालयास सादर करावेत. सिलबंद लिफाफयावर " **संगणक संच आणि नेटवर्कींग यंत्रणेसाठी वार्षिक देखभाल व दुरुस्ती सेवा संविदा करार (AMC)** " असा स्पष्ट उल्लेख करावा.

**दरपत्रके सादर करणेविषयीचा तपशिल व कालावधीः**

| अ.क्र. | तपशिल | कालावधी |
|---|---|---|
| १ | दरपत्रके सादर करण्यासाठीचा कालावधी | दि.२४/०७/२०२५ ते दिनांक ०१/०८/२०२५ शासकिय सुट्टी वगळून कार्यालयीन वेळेत |
| २ | दरपत्रके सादर करण्याचा अंतिम दिनांक | दिनाक ०१/०८/२०२५ वेळ - सायंकाळी ०६.१५ पर्यत |
| ३ | दरपत्रके उघडण्यासाठीचा दिनांक व वेळ | दि.०४/०८/२०२५, वेळ - दु.०२.०० |
| ४ | दरपत्रके उघडण्याचे स्थळ | उपसंचालक, आरोग्य सेवा (परिवहन), पुणे यांचे कार्यालय, नायडू हॉस्पीटल कंपाऊड, केनेडी रोड, पुणे - ४११००१. |

प्राप्त संस्थांची दरपत्रके उघडण्याची वेळ ही शक्यतो दिनांक दि.०४/०८/२०२५, रोजी दुपारी ०२.०० वाजता असेल यामध्ये बदल होण्याची शक्यता राहील. व सदर दरपत्रके उपस्थित असलेल्या संबंधित संस्थांचे प्रमुख अथवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या प्रतिनिधींचे समक्ष उघडण्यात येतील.

**<u>दरपत्रके सादर करणेबाबतच्या अटी व शर्ती</u>**

१) दरपत्रकासोबत एकल निविदा असणेबाबत तसेच खरेदी प्राधिकाऱ्यासोबत कोणत्याही प्रकारचा हितसंबंधाचा संघर्ष नसल्याबाबत "निविदाकारांची हमी" चे विहीत नमून्यातील हमीपत्र सोबत जोडणे आवश्यक आहे.

२) दरपत्रकासोबत GST Ragistriation Certificate सादर करावीत.

३) दर पत्रकासोबत पॅन कार्डची छायांकित प्रत देणे बंधनकारक आहे.

४) दरपत्रके ही संस्थेच्या लेटरहेडवर असावीत तसेच नमुना प्रपत्रामध्येच दर नमूद करुन सही व शिक्क्यासह सादर करावीत.

५) संस्थेच्या लेटरहेडवर GST Ragistriation नंबरचा उल्लेख असणे आवश्यक आहे.

६) अटी व शर्तीसह सादर करण्यात आलेल्या दरपत्रकाचा विचार करण्यात येणार नाही.

७) खाडाखोड असलेले व विहीत मुदतीनंतर प्राप्त दरपत्रके विचारात घेतले जाणार नाहीत.

८) दरपत्रकातील दरामध्ये जीएसटी स्वतंत्रपणे दर्शविण्यात यावा.

९) दरपत्रके उपसंचालक, आरोग्य सेवा(परिवहन),पुणे या नावे सीलबंद लिफाफ्यात या कार्यालयास स्वहस्ते अथवा पोस्टाने पाठवावीत.

१०)संगणक संच आणि नेटवर्कीग यंत्रणेसाठी वार्षिक देखभाल व दुरुस्ती सेवा संविदा करार या स्वरुपाचे कामकाज केल्याबाबतचे संबंधीत पुरवठादार यांनी मागील ३ वर्षाचा शासकिय कार्यालयामध्ये पुर्वानुभवाबाबतचे पुरवठा आदेश जोडणे बंधनकारक राहील.त्यानुसार अनुभव अहर्ता पुर्ण करणाऱ्या पुरवठादाराचे दरपत्रक ग्राहय धरण्यात येईल अन्यथा रदद् करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

११)संगणक,प्रिंटर, नेटवर्कीग यंत्रणेमध्ये तांत्रिक बिघाड झाल्यास,या कार्यालयाकडून दूरध्वनीवरुन कळविताच १ तासांचे आंत आपला प्रतिनिधी कार्यालयामध्ये उपस्थित राहणे बंधनकारक राहील.उपस्थित न राहिल्याबाबतच्या ३घटना घडल्यास, आपणासं लेखी नोटीस देवून, त्याप्रमाणे योग्य ती कारवाई केली जाईल.

१२) उपरोक्त कामे करण्याबाबत मा.उपसंचालक आरोग्य सेवा (परिवहन) पुणे यांचा निर्णय अंतीम राहील. त्यांनी सर्व अधिकार राखून ठेवले आहेत.

१३) दरपत्रकांना प्रतिसाद न मिळाल्यास, अथवा त्यामध्ये काही त्रूटी आढळून आल्यास, ही दरपत्रके (नोटीस) प्रक्रीया स्विकारणे, नाकारणे अथवा रद्द करणे इ. अधिकार संपुर्ण अधिकार हे या कार्यालयाने राखून ठेवलेले आहेत. याची कृपया नोंद घ्यावी.

१४) किमान दरास मान्यता झाल्यानंतर रुपये १००/- च्या बंधपत्रावर कराराचे अटी शर्ती लेखी स्वरुपात मान्य असल्याचे बंधपत्र सादर करावे लागेल. तसेच करार वैध असेपर्यत दरामध्ये कोणत्याही प्रकारची वाढ करण्यात येणार नाही.

१५) किमान दरास मान्यता झाल्याचे आदेश निर्गमीत झाल्याचे दिनांकापासून पूढे एक वर्ष कालावधीपर्यत सदर दर अस्तित्वात राहील.

१६) सेवा संविदा कराराचे देयके ४ तिमाहीमध्ये विभागुन देण्यात येईल.तसेच अनुदानाचे उपलब्धतेनुसार देयकाची अदायगी करण्याबाबत कार्यवाही करण्यात येईल.

१७) देखभाल दुरुस्तीचा करार झाल्यानंतर दर तीन महिन्यांनी सर्व संगणक व प्रिन्टर व नेटवर्कीग यंत्रणेची प्रतिबंधात्मक देखभाल व दुरुस्ती करणे बंधनकारक राहील. यामध्ये (ब्लोअरद्वारे क्लिनींग,सॉफटवेर क्लिनींग, अॅन्टीव्हायरस सॉप्टवेअर अपेडेटींग/नवीन टाकणे, सॉप्टवेअर/डाटा बॅकअप, लॅन/इंटरनेट कनेक्टीव्हीटी ट्रबलशुटींग करणे) इ.कामकाज करणे आवश्यक राहील.

१८) शासन निर्णय दि.०१/१२/२०१६ उद्योग, उर्जा व कामगार विभाग मधील तरतुदीनुसार दरपत्रक उघण्याच्या दिवशी संबधित पुरवठादार अथवा त्यांचे प्रतिनिधी उपस्थित नसल्यास प्राप्त सर्व दरपत्रकांची उघडण्याची प्रक्रिया स्थानिक कार्यालयीन खरेदी समितीकडून पार पाडण्यात येईल याची नोंद घ्यावी, याबाबतचे संपूर्ण अधिकार कार्यालयीन स्थानिक खरेदी समितीस तसेच उपसंचालक, आरोग्य सेवा (परिवहन) पुणे-०१ यांना राहतील याची नोंद घ्यावी.

१९) संबधित पुरवठादाराकडून नमूद केल्यानुसार दरपत्रकामध्ये नमूद केल्यानुसार त्यांनी सदरचे काम स्वतः करावे त्याऐवजी अन्य कोणासही इंजिनिअर म्हणून कार्यालयात पाठविण्यात येऊ नये तसे आढळून आल्यास आपल्या सेवेमुळे कार्यालयीन कामकाजाचा खोळंबा निर्माण झाल्यास तसेच आपली सेवा असमाधानकारक वाटल्यास कोणतीही पूर्व सुचना न देता करण्यात आलेला वार्षिक करार तात्काळ रद्द करण्यात येईल व नव्याने वार्षिक करार पुरवठा आदेश न्युनतम पुरवठादार यांस देण्याबाबत अथवा नव्याने पुरवठादार नेमण्याबाबत योग्य तो निर्णय कार्यालयीन स्थानिक खरेदी समितीकडून घेण्यात येईल, याबाबतचे संपूर्ण अधिकार स्थानिक कार्यालयीन खरेदी समिती व मा.उपसंचालक, आरोग्य सेवा (परिवहन) पुणे-०१ यांना राहतील याची नोंद घ्यावी नंतर याबाबत कोणत्याही तक्रारीची दखल घेतली जाणार नाही.

(जयंत गो.मुळे)
उपसचांलक, आरोग्य सेवा (परिवहन)
पुणे -४११ ००१.

प्रत :- नोटीस बोर्ड

## प्रपत्र "अ"

| Annual Maintainance Conctract | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **Sr. No.** | **Discription of Work** | **Estimated Quantity** | **Rate Per Set /System** | **GST** | **Total Rate Offered** |
| 1 | **Annual Maintainance Contract of Various DeskTop Computers Core i3/ Core i5 ( HCL/LENOVO /ACER) Various Leaserjet/ MF Printers ( HP/Cannon) Various Scanners ( Cannon/EPSON)** | **(30 Set) One Set of Computer, Printer And Scanners** | | | |
| 2 | **Annual Maintainance Contract of Networking System and Internat Troubleshooting & Fault Finding For One Year** | **Complete System (30 Points switch & router )** | | | |

**Signiture & seal**

प्रपत्र- अ

**निविदाकारांनी द्यावयाच्या हमीपत्राचा नमूना**

मी/आम्ही/आमची संस्था या पत्रान्वये हमी देतो की, आमचा खरेदी प्राधिकाऱ्याबरोबर कोणत्याही प्रकारे हितसंबंधाचा संघर्ष नाही तसेच मी/आम्ही/आमची संस्था सदर कामासाठी फक्त एकच निविदा सादर केलेली आहे. तसेच दरपत्रक प्रक्रियेमध्ये भाग घेणाऱ्या अन्य संस्थांमध्ये आम्हाला कोणत्याही प्रकारचे थेट स्वारस्य नाही.

दिनांक :-

निविदाधारकाची सही व संस्थेचा शिक्का